# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF/AZ/R/149/2008/70/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Balu Shankar Shrikhande, Ekta Nagar, Jatwada Road, H.No.28 Harsool,Aurangabad.
(Consumer No. 490011688583).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Balu Shankar Shrikhande, Ekta Nagar, Jatwada Road, H.No.28, Harsool, Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter. **The hearing is fixed on 18.11.2007 at 12.00 Hours**

You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

Copy to:-
Shri Balu Shankar Shrikhande,
Ekta Nagar, Jatwada Road, H.No.28 ,
Harsool, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४९/२००८/७०**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०१/११/२००८**
**निकाल दिनांक ;- ३१/१२/२००८**

**श्री बाळु शंकर श्रीखंडे,**
**एकतानगर जटवाडारोड (हर्सुल),**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६८८५८३) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०१/११/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १८/११/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार, श्री बाळु शंकर श्रीखंडे, राहणार एकतानगर जटवाडा रोड औरंगाबाद, यांनी महावितरण कंपनीकडुन दिनांक ०२/०३/२००५ रोजी घरगुती वापरासाठी नवीन वीज पुरवठा घेतला महावितरण कंपनी तर्फे त्यांना देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००११६८८५८३ असा आहे.नवीन वीज पुरवठा करतांना महावितरण कंपनीने त्यांना नवीन वीज मीटर न देता जुने वापरण्यात आलेले वीज मीटर दिले.या जुन्या मीटरवरील रिडींग ही त्यावेळी ७८२७ अशी असल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. नवीन मीटर बसवण्याबाबत अर्जदाराने केलेल्या विनंतीची कोणतीही दखल महावितरणच्या संबंधीत अधिका-यांनी घेतली नसल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे.महावितरण तर्फे अर्जदारास नवीन वीज पुरवठा घेतल्यानंतर जानेवारी २००६ मध्ये २३ महीन्याचे लॉक स्टेटस दाखवत २९७३६.४८/-रूपयाचे वीज बिल आकारण्यात आले.या चुकीच्या बिलाबाबत अर्जदाराने केलेल्या तक्रारीची दखल न घेता त्याचा वीज पुरवठा सुरूवातीस तात्पुरता खंडित करण्यात आला व काही काळानंतर तो कायम स्वरूपी बंद करण्यात आला.अर्जदाराने महावितरण कंपनीच्या या कृती विरूध्द मंचात तक्रार दाखल केली असून सुधारीत वीज बिल देण्याबाबत महावितरण कंपनीस आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १८/११/२००८ रोजी झालेल्या पहील्या सुनावणीच्या वेळी अर्जदार बाळु शंकर श्रीखंडे तसेच महावितरण तर्फे नोडल अधिकारी जी.एस. राठौर व शहागंज उपविभागाचे सहाय्यक अभियंता सुतार उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी त्यांचा जबाब सोबत अर्जदाराचे सी.पी.एल., मीटर बदली अहवाल व उपकार्यकारी अभियंता याचे पत्र मंचात दाखल केले. त्याच प्रमाणे या प्रकरणाची योग्य ती कागदपत्रे संबंधीत विभागाकडुन उपलब्ध झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

महवितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल हे प्रथम दर्शनी चुकीचे दिसत असल्यामुळे तसेच अर्जदाराच्या तक्रारीची दखल न घेता व कोणतीही पुर्व सुचना न देता त्याचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला असल्याचे मंचास दिसुन आले.मंचाने अर्जदाराकडुन रूपये १०००/-पार्टपेमेंट म्हणून स्विकारल्यानंतर २४ तासाच्या आत त्याचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्याचे आदेश महावितरण कंपनीस दिले व याप्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २५/११/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक २५/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी सुधारीत बिल दाखल करण्यासाठी तारीख पुढे वाढवण्याची विनंती केली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी ०५/१२/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक ०५/१२/२००८ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी बिल रिव्हीजन प्रस्तावाची प्रत मंचात दाखल केली व अर्जदारास ३५८१६.५४/-रूपयाची रक्कम बिलातुन क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली. मंचाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून व सी.पी.एल. वरून असे आढळुन येते की, महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास नवीन वीज पुरवठा करतांना जुने बंद स्थितीत असलेले मीटर लावण्यात आले. या जुन्या मीटरवरील रिडींगची नोंद ७८२७ अशी असल्याचे दिसुन येते महावितरण कंपनीने अर्जदारास २३ महीन्यानंतर लॉक स्टेटस दाखवत २९७७६.६८/- रूपयाचे आकारलेले बिल चुकीचे असल्याचे मंचाचे मत आहे.अर्जदाराने या चुकीच्या वीज बिलाबाबत केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेता त्याचा वीज पुरवठा कोणतीही पुर्व सुचना न देता खंडित करण्यात आला. महावितरण कंपनीची ही कृती वीज कायदा २००३ मधील कलम ५६ मधील तरतुदीचे उंल्लघन करणारी आहे.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या येथे जोडलेला वीज भाराची नोंद घेऊन बिल रिव्हीजनचा प्रस्ताव तयार केला असुन त्याची एक प्रत मंचात दाखल केली आहे. नोडल अधिकारी यांच्या बिल रिव्हीजन प्रस्तावाचे निरीक्षण केल्यावर अर्जदार हा त्याने जोडलेल्या एकुण ३६० वॅट हा वीजेचा भार रोज पाच तास वापरत असल्याचे गृहीत धरून त्याचा महीन्याचा एकुण वीज वापर ५४ युनिट असा गृहीत धरला आहे. नोडल अधिकारी यांनी सदरील बिल रिव्हीजन करतांना लोड फॅक्टर विचारत न घेतल्यामुळे अर्जदाराचे करण्यात आलेले हे बिल रिव्हीजन चुकीचे असल्याचे व लोड फॅक्टर विचारात घेतल्यानंतर अर्जदाराचा वीज वापर हा प्रति महा २६ युनिट असल्याचे मंचाचे मत आहे.

६) वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यानंतर असे दिसून येते की, महावितरण कंपनीतर्फे ग्राहकास देण्यात आलेले वीज बिल हे चुकीचे असुन नोडल अधिकारी यांच्यातर्फे दाखल करण्यात आलेला वीज बिल रिव्हीजन प्रस्ताव हा चुकीच्या त्रांत्रीक आधारावर दाखल करण्यात आलेला आहे. ग्राहकास २३ महीन्याच्या कालावधीनंतर चुकीच्या वीज बिलाची आकारणी करणे,त्याच्या तक्रारीची दखल न घेणे तसेच कोणतीही पुर्व सुचना न देता त्याचा वीज पुरवठा खंडित करणे ही महावितरण कंपनीची कृती सेवेतील त्रुटी म्हणुन मानण्यात येत आहे.अर्जदाराने दाखल केलेली तक्रार योग्य असुन तो नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास नविन वीज पुरवठा दिलेल्या तारखेपासुन

२) (०२/०३/२००५) ते वीज पुरवठा पुर्नजोडणी केलेल्या तारखेपर्यत (१९/११/२००८) या काळातील देण्यात आलेली सर्व वीज देयके रद्द करण्यात येत आहे.

३) महावितरण कंपनीने वरील काळासाठी अर्जदारास २६ युनिट प्रतिमहा या प्रमाणे वीज देयक आकारणी करावी व या वीज देयकात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

४) वरील प्रमाणे अर्जदारास देण्यात येण्या-या सुधारीत वीज देयकात अर्जदाराने या काळात भरलेल्या रक्कमेची वजावट करावी व अर्जदारास ३० दिवसात सुधारीत वीज देयक द्यावे.

५) महावितरण कंपनीने ग्राहकास योग्य सेवा न दिल्यामुळे व वीज कायदा २००३ मधील कलम ५६ मधील तरतुदीचे पालन न करता कोणतीही पुर्व सुचना न देता वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे ५००/- रूपये नुकसान भरपाई ३० दिवसाच्या आत द्यावी.

वरील आदेशाचे दिलेल्या मुदतीत ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४९/२००८/७०** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री बाळु शंकर श्रीखंडे,**
**एकतानगर जटवाडारोड (हर्सुल),**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१४९/२००८/७० )

आपण दिनांक ०१/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ,औरगाबाद.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**